सुधारणा व पुनर्वसन
फोन क्र. : (०२०) २६१२३५६३
फॅक्स क्र. : (०२०) २६१२५८७८
Email ID : igoffice.est1-mh@gov.in
Website : www.mahaprisons.gov.in

महाराष्ट्र शासन, गृह विभाग

अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे
जुनी मध्यवर्ती इमारत, २ रा मजला,
पुणे - ४११ ००१

जाक्र. इएसटी/तां. भरती/Answer Key/Objection Form/२०२५/ १५५५ /कक्ष १(३),पुणे दिनांक ०६.०२.२०२५

## परिपत्रक

**विषय** :- कारागृह विभागातील तांत्रिक पदांची सरळसेवा भरतीप्रक्रिया-२०२३ मधील प्रात्यक्षिक परिक्षेचे उत्तरे व उत्तर तालिका (Answer Key) बाबत सूचना देणेबाबत.

**संदर्भ** :- कारागृह विभाग पद भरती जाहिरात दि. ०१.०१.२०२४

उपरोक्त विषयाचे कारागृह विभागातील लिपिक व तांत्रिक पदांची सरळसेवा भरती-२०२३ अंतर्गत तांत्रिक संवर्गातील तांत्रिक पदांची प्रात्यक्षिक ऑनलाईन परीक्षा दिनांक ३१.०१.२०२५ व ०४.०२.२०२५ या कालावधीत झाली आहे. या परीक्षेत विचारले गेलेल्या प्रश्नांची उमेदवारांनी देलेली उत्तरे व उत्तर तालिका (Answer Key) उमेदवारांना दिनांक ०६.०२.२०२५ रोजी पासुन कारागृह विभागाच्या www.mahaprison.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिली जाणार आहे. यासंदर्भात काही हरकत असल्यास उमेदवारास आपल्या लॉग इन आयडी व पासवर्ड द्वारे प्रति हरकत रुपये १००/- शुल्क जमा करुन कारागृह विभागाच्या www.mahaprison.gov.in या संकेतस्थळावर हरकत दाखल करता येईल.

सदर हरकत दाखल करण्याची मुदत दिनांक ०६.०२.२०२५ ते दिनांक ०८.०२.२०२५ रात्री ११.५९ वाजेपर्यंत असून मुदतीनंतर प्राप्त झालेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. तसेच हरकती संदर्भात कोणताही पत्रव्यवहार कारागृह मुख्यालयाच्या कार्यालयात लेखी अथवा ई-मेलद्वारे स्विकारला जाणार नाही, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**(डॉ.जालिंदर सुपेकर)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (मुख्यालय)
कारागृह व सुधारसेवा,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१